अहिल्यानगर महानगरपालिका
आरोग्य विभाग
आ.नं. २२
दिनांक : ८ / ४ /२०२६

## कोटेशन नोटीस

अहिल्यानगर महानगरपालीका आरोग्य विभाग मध्ये खालील प्रमाणे कामाला सुरुवात करावयाची आहे. कामाचा तपशील खालील प्रमाणे आहे. सदर कामाचे सेवा शुल्क आपले लेटर हेडवर दि. ०९/०४/२०२६ ते दि. १७/०४/२०२६ या दिनांक पर्यत अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभाग जुने मनपा कार्यालय येथे ऑफिस वेळेत जमा करावी.

यशस्वी ठेकेदाराला नियमाप्रमाणे करारनामा करून द्यावा लागेल. कोणतेही अगर सर्व कोटेशन नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे अटी युक्त कोटेशन फेटाळण्यात येईल, अन्यथा कार्यारंभ आदेश देण्यात येणार नाही.

कामाचे नाव - मनपा शहर हद्दीमध्ये खाजगी रुग्णालय व सरकारी रुग्णालय मध्ये मयत झालेल्या रुग्णांचे मृतदेह रुग्णालय ते मयताचे मनपातील घरापर्यंत शववाहीनीने पोहोच करणे कामी मनुष्य बळ पुरवठा करणे बाबत

(शववाहीनी महानगरपालिका मालकीचे असलेले वाहनाने मोफत वाहतुक करणे व मयताचे वारसाला म.न.पा. मार्फत सेवा व सुविधा पुरवणे)

| अ.क्र. | आवश्यक मजूर | आवश्यक पद संख्या | मासिक वेतन प्रती कर्मचारी | ठेकेदाराने द्यावयाचे सेवा शुल्क % | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाहन चालक (HMV चे लायसेन्स असणे आवश्यक) | २ | १९०४५/- | | १ वर्षे |
| २ | पुरुष कामगार | २ | १७९८५/- | | १ वर्षे |
| (कामगार आयुक्त ५४३-५५० किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत दि.०४/०२/२०२६ अन्वये) | | | | | |

**टीप** - १. सदर कामासाठी शववाहिनीसाठी डीझेल व वातानुकुलीत जनरेटरकरिता पेट्रोल महानगरपालिका मार्फत दिले जाईल व इंधन घेतल्यानंतरची नोंद लॉकबुकला ठेवणे आवश्यक आहे.

२. कामाच्या अटी व शर्ती आरोग्य विभाग येथे कार्यालयीन वेळेत पाहता येतील.

3. संस्था प्रमुखाचे व वाहनचालकाचे दुरध्वनी क्रमांक शववाहिनीवर मोठ्या अक्षरात, दर्शनी भागावर लिहणे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी
अहिल्यानगर महानगरपालिका

**सोबत** - आवश्यक दस्तऐवज जोडणे आवश्यक आहे.

१. संस्था नोंदणी प्रमाणपत्र
२. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र
३. पॅन कार्ड
४. कामगार भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र
५. कर्मचा-यांच्या बाबतीत इ.पी.एफ. नोंदणी प्रमाणपत्र
६. संस्थेचे मागील दोन वर्षाचे आर्थिक ताळेबंद/ उलाढाल व स्थावर मालमत्ता बाबतचे प्रमाणित कागद
७. अनुभवाचा दाखला
८. संस्थेकडे कुठलेही शासकीय थकीत कर अथवा देणे बाकी नसल्याचे प्रमाणपत्र
९. मागील दोन वर्षाचे आयकर भरल्याचे विवरणपत्र

**प्रत माहितीस्तव :**

१) प्रसिद्धी विभाग प्रमुख सदर नमुन्याची जाहिरात स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेत यावी.
२) संगणक विभाग प्रमुख अहिल्यानगर महानगरपालिका सदरची नोटीस महानगरपालिकेच्या स्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.
३) म.न.पा. हवालदार सदरची नोटीस महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डवर डकविण्यात यावी.
४) आरोग्य विभाग जुनी महानगरपालिका नोटीस बोर्डावर डकविण्यात यावी.